# बुलेट ट्रेनचे भूसंपादन महिनाभरात मार्गी लावा!

केंद्र सरकार विविध प्रकल्पांना मान्यता देत असून राज्यानेदेखील याचा फायदा करून घेतला पाहिजे आणि पाठपुरावा करून योजना मार्गी लावल्या पाहिजेत यावर मुख्यमंत्र्यांनी रविवारच्या बैठकीत भर दिला.

मुंबई ते अहमदाबाद अशी ५०८ .१७ किमी लांबीचा बुलेट ट्रेन प्रकल्प असून यासाठी १ लाख ८ हजार कोटी रुपये खर्च आहे. गुजरात आणि महाराष्ट्रात मिळून एकूण १२ स्थानके असून महाराष्ट्रात त्यातील ४ स्थानके आहेत. मुंबईतील एक स्थानक वगळून उर्वरित तिन्ही स्थानके उन्नत प्रकारातील आहेत. यासाठी जपान सरकारने कर्ज दिले असून ५० टक्के खर्चाचा वाटा केंद्र सरकार, तर २५ टक्के वाटा प्रत्येकी महाराष्ट्र आणि गुजरात सरकार उचलणार आहे. यासाठी एमएमआरडीएमधील ४.८ हेक्टर जागा भूमिगत स्थानकासाठी ३० सप्टेंबरपर्यंत उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही एमएमआरडीएने करण्याचे निर्देश एकनाथ शिंदे यांनी दिले. बैठकीमध्ये बुलेट ट्रेन व्यतिरिक्त मुंबई मेट्रो मार्ग-३, ४, ५, ६, ९ आणि ११ तसेच मेट्रो मार्ग २ ए (दहिसर पूर्व ते डीएन नगर), मेट्रो मार्ग-७ (अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व) यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. वडाळा ते कासारवडवली हा मेट्रो मार्ग-४ तसेच ठाणे ते कल्याण व्हाया भिवंडी हा मेट्रो मार्ग-५ या मार्गांसाठी भूसंपादन तसेच हस्तांतरणाचे काम वेगाने पूर्ण करावे, अशी सूचना शिंदे यांनी केली.

### मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचे काम पुढील वर्षी पूर्ण होणार

शिवडी-वरळी जोडरस्ता तसेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प वेगाने पूर्ण करावा. या प्रकल्पाचे काम ८४ टक्के पूर्ण झाले असून पुढच्या वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये हे काम संपेल, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. सूर्या पाणी पुरवठा योजना पूर्ण होत आली असून पुढच्या वर्षीपासून नागरिकांना पाणी पुरवठा करणे शक्य होईल, मात्र यासाठी वसई-विरार महानगरपालिका तसेच मीरा-भाईंदर महानगरपालिकेने तातडीने जलवाहिन्या टाकण्यासाठी निविदा व इतर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.